# महाराष्ट्र शासन
# आदिवासी विकास विभाग
# अपर आयुक्त, आदिवासी विकास,
# गिरीपेठ, नागपूर

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचे कार्यक्षेत्रातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर हया जिल्हयातील सात प्रकल्पा अंतर्गत शासकीय आश्रम शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, शासकीय वसतिगृहे व कार्यालयातील मागासवर्गीय प्रवर्गातील खालील रिक्त पदाकरिता विहीत नमुन्यातील अर्ज मागवित आहे.

| अ. क्रं | पदाचे नांव | एकुण पदे | अ. जा. | अ. ज. | विजाभज | | | | विमाप्र | इमाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | | |
| १. | गृहपाल (पुरुष) | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | महिला अधिक्षिका | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३. | अधिक्षक (पुरुष) | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ४. | वरिष्ठ लिपीक/सांख्यिकी सहायक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५. | कनिष्ठ लिपीक | ८ | १ | १ | २ | ० | २ | ० | २ | ० |
| ६. | वाहन चालक | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | ग्रंथपाल | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

**उपरोक्त मागासवर्गीय पदामध्ये खालील प्रमाणे समांतर आरक्षण संबंधित आरक्षणात राहील.**

| अ.क्रं | पदाचे नांव | | समांतर आरक्षणाची पदे | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ. जा. | अ. ज. | विजाभज | | | | विमाप्र | इमाव | |
| | | | | | अ | ब | क | ड | | | |
| १. | गृहपाल (पुरुष) | मा. सै. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २. | अधिक्षक (पुरुष) | प्र.ग्रस्त. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३. | कनिष्ठ लिपीक | मा. सै. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | महिला | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

## -: शैक्षणिक अर्हता :-

| | | |
|---|---|---|
| **पद क्रमांक** | १. | गृहपाल (पुरुष) या पदाकरिता जे समाजकार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदव्युत्तर पदवी धारण करतात. |
| **पद क्रमांक** | २. | महिला अधिक्षिका या पदाकरिता समाजकार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदवी धारण करतात. |
| **पद क्रमांक** | ३. | अधिक्षक (पुरुष) या पदाकरिता समाजकार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदवी धारण करतात. |
| **पद क्रमांक** | ४. | वरिष्ठ लिपीक / सांख्यिकी सहायक या पदाकरिता जे पदवी धारण करतात परंतू गणित/अर्थशास्त्र/वाणिज्य आणि सांख्यिकी शाग्त्र यापैकी एका विषयासह पदविधारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य राहील. |
| **पद क्रमांक** | ५. | कनिष्ठ लिपीक पदाकरिता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण, टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मि, मराठी ३० श.प्र.मि. आवश्यक आहे. तसेच डि. ओ. ई. ए. सी. सी. किंवा एमएससीआईटी संगणक हाताळणे व वापरणे बाबत प्रमाणपत्र. |
| **पद क्रमांक** | ६. | वाहन चालक पदाकरिता इयत्ता ४ थी उत्तीर्ण, जड वाहन, मोटार कार जीप चालविण्याचे ड्रायव्हींग लायसन्स मोटार व्हीकल ॲक्ट-१९३९ नुसार व मराठी आणि हिंदी भाषा बोलता यावी ३ वर्ष जड वाहन चालविण्याचा अनुभव व मोटर कार वाहन दुरुस्ती अनुभवाचे प्रमाणपत्र. |
| **पद क्रमांक** | ७. | ग्रंथपाल पदाकरिता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण , ग्रंथालय प्रशिक्षण या मधिल शासन मान्यता प्राप्त महाविद्यालयाचे अथवा संस्थेचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे. ग्रंथालय शास्त्र या मधिल पदविका धारण करणा-या आणि किमान दोन वर्षापेक्षा कमी नाही इतका ग्रंथालय कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना पसंतीक्रम राहील. |

२/..

**वयोमर्यादा** :- सर्वसाधारण साठी ३३ वर्ष व मागासवर्गीयासाठी ३८ वर्ष (प्रकल्पग्रस्त/माजी सैनिकाकरिता शासन नियमानुसार शिथिलक्षम)

**वेतनश्रेणी** :- पद क्रमांक १ चे पदाकरिता --- ९३००-३४८०० ग्रेडवेतन ४३००
पद क्रमांक २ चे पदाकरिता --- ५२००-२०२०० ग्रेडवेतन २४००
पद क्रमांक ३ चे पदाकरिता --- ५२००-२०२०० ग्रेडवेतन २४००
पद क्रमांक ४ चे पदाकरिता --- ५२००-२०२०० ग्रेडवेतन २४००
पद क्रमांक ५ चे पदाकरिता --- ५२००-२०२०० ग्रेडवेतन १९००
पद क्रमांक ६ चे पदाकरिता --- ५२००-२०२०० ग्रेडवेतन १९००
पद क्रमांक ७ चे पदाकरिता --- ५२००-२०२०० ग्रेडवेतन २४००

## -: उमेदवार निवडीची पध्दत :-

१. **लेखी परिक्षा :-** वाहन चालक पदाकरिता ५० गुणांची आणि उर्वरित पदाकरिता इंग्रजी-मराठी व सामान्य ज्ञान बौध्दीक चाचणी या विषयाची २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची प्रश्नांची प्रश्नपत्रीका राहील. सदर लेखी परिक्षा दोन तासाची राहील.

२. **मुलाखत :-** लेखी परिक्षेत आरक्षणानुसार विषयाच्या गुणानुक्रमे निवड झालेल्या उमेदवाराची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

## अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सुचना

१) अर्जदार भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण रहिवासी असणे आवश्यक आहे.

२) पदांच्या संख्येत बदल करण्याचा तसेच आवेदन पत्र अस्विकार करण्यास, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल करण्याबाबत अंतिम निर्णय याबाबतचे संपूर्ण अधिकार संबधित कार्यालयास राहील.

३) जाहीरातीतील विहीत नमुन्यातच टाईप केलेले अर्ज पासपोर्ट आकाराच्या अद्यावत काढलेला फोटो साक्षांकित करुनच अर्ज सादर करावा लागेल.

४) विहित नमुन्यातील अर्जामध्ये सर्व शैक्षणिक अर्हता /जात/वर्गवारी/जन्मतारिख व इतर आवश्यक परिपूर्ण माहिती नमुद करण्यात यावी. परिपूर्ण माहिती नसलेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. अर्जासोबत शैक्षणिक पात्रते संबधी वा इतर कागदपत्रे जोडण्याची आवश्यकता नाही. तेव्हा अर्ज परिपूर्ण भरुन पाठवावा.

५) परिपुर्ण स्थितीतील अर्ज लिफाफ्यावर ठळक अक्षरात पदाचे नांव व कोणत्या वर्गवारीत अर्ज केले आहेत हे नमुद करुन " अपर आयुक्त, आदिवासी विकास, गिरीपेठ, अमरावती रोड, आर. टी. ओ. कार्यालयासमोर, नागपूर - ४४० ०१० " या पत्यावर **दिनांक ३१.१०.२०११** पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत टपालाद्वारे स्विकारले जातील त्यानंतर विहित कालावधीनंतर उशिराने प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाही.

६) शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखामार्फत विहीत केलेल्या दिनांका पर्यंत पाठवावेत.

७) उमेदवाराने प्रत्येक पदासाठी स्वतत्र अर्ज पाठविणे आवश्यक आहे.

८) उमेदवारांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आवयक आहे.

९) अर्जाची छाननी केल्यानंतर वैध अर्जदारांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यांत येईल.

१०) लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा खर्च दिल्या जाणार नाही.

११) टपाल खात्याच्या कोणत्याही विलबांस अथवा टपाल गहाळ झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२) निवड झालेल्या उमेदवरांना विभागातील कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या जिल्हयातील कोणत्याही ठिकाणी नेमणूक दिली जाईल.

१३) मागासवर्गीय पदावर निवड झालेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील त्याशिवाय त्यांच्या नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

३/..

१४) लेखी परीक्षेचा दिनांक व स्थळ स्वतंत्ररित्या पत्राद्वारे कळविण्यात येईल. वरील पदाची परीक्षा एकाच ठिकाणी व एकाच दिनांकास घेण्यात येईल.

१५) शासन सेवेत कार्यरत कर्मचा-यांना मुलाखतीच्या वेळी खाते प्रमुखाचे " ना हरकत प्रमाणपत्र" सादर करणे आवश्यक राहील.

१६) उमेदवारांनी जाहिरातीत नमुद केल्या प्रमाणे पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज करावा. अर्जात चुकीची किंवा अपुर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रता धारक नसल्याचे आढळुन आल्यास त्यांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्य करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

१७) सदरहू जाहिरात मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्याकरिता प्रसिध्द करण्यात येत आहे. फक्त याच जाहिरातीस प्रतीसाद देऊन ज्या उमेदवारांचे अर्ज प्राप्त होतील, केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील, यापूर्वी या कार्यालयात उमेदवारांकडून प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

१८) उमेदवार हा विवाहित असल्यास दिनांक २८ मार्च, २००६ नंतर तिसरे अपत्य नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत दयावे लागेल. दिनांक २८ मार्च, २००६ नंतर तिसरे अपत्य असल्यास नियुक्तीकरिता त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.

१९) उमेदवारास नियुक्ती मिळाल्यानंतर विहित कालावधीत खात्याची परीक्षा / भाषा परीक्षा संगणक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

२०) परीक्षा शुल्क म्हणून मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये २००/- चे धनाकर्ष (डिमांड ड्रॉफ्ट) (फक्त स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे) च्या स्वरुपात अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे. धनाकर्ष सहाय्यक आयुक्त (लेखा), आदिवासी विकास, नागपूर यांचे नावे काढण्यांत यावा.

२१) वरील नमुद पद क्रमांक १ ते ४ पदाकरिता शासन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील.

२२) यापूर्वी या कार्यालयामार्फत सदर पदाकरिता देण्यात आलेली जाहिरात रद्द करण्यात येत आहे. यापूर्वी या पदाकरिता अर्ज भरलेल्या उमेदवारांना परत नव्याने अर्ज करावे लागतील याची नोंद घ्यावी.

२३) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती / विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास वर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन-२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -८ ) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.१.२००४ पासून आंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्व (क्रिमिलेअर) विजा-अ, भज-ब/क/ड, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१०-११ या कालावधीतील (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केले असले पाहीजे.

***मुळ प्रत मा. अपर आयुक्त, यांचे द्वारा अनुमोदित.***

**अपर आयुक्त**
**आदिवासी विकास, नागपूर करिता.**

# अर्जाचा नमुना

अर्जदाराने स्वत:चा अलीकडे काढलेला ३.५ सेंमी X ४.५ सेंमी आकाराचा फोटो चिकटवावा

अर्जदाराची स्वाक्षरी

प्रति,
अपर आयुक्त,
आदिवासी विकास,
अमरावती रोड, गिरीपेठ
नागपूर-४४० ०१०.

१. अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव :-

आडनाव नाव वडिलांचे/आईचे/पतीचे नाव

१. अर्जदाराचे नांव
(देवनागरी लिपीत)

Name of Applicant
(In capital letters) Surname First Name Fathers/Mothers/Husband Name

२. अर्जदाराचा पत्ता: ------------------------------------------------------------------------------------
(देवनागरी लिपीत) ------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------पिन

Address of Applicant:- ------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------PIN:

३. जन्मतारीख: दिनांक महिना वर्ष वय

४. जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास उमेदवाराचे वय ----------- वर्ष -------------- महिना ------------- दिवस

५. लिंग: (१) पुरुष (२) स्त्री

६. अर्जदार विवाहित आहे काय ? (१) होय (२) नाही
(विवाहीत असल्यास हयात अपत्यांची संख्या--------------------)

७. अर्जदाराचा प्रवर्ग (जात): ----------------------------------
अर्जदाराने आपल्या जातीच्या प्रवर्गासाठी खाली दिलेला संकेतांक समोरील चौकोनात लिहावा.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज. ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |

८. अर्जदार मुद्दा क्र. २४ मधील ३ ते ८ या प्रवर्गातील मधील फक्त महिला उमेदवार यापैकी असेल तर तो उन्नत व प्रगत गटातील आहे/ नाही (१) आहे (२) नाही

९. अर्जदार खालील आरक्षणासाठी पात्र आहेत काय ? योग्य तो संकेतांक चौकोनात भरावा
अ) माजी सैनिक (१) माजी सैनिक स्वत: (२) शहिद झालेल्या किंवा कायमचे अपंगत्व सैनिकाची वीरपत्नी अविवाहित मुलगा/अविवाहित मुलगी (३) नाही

ब) भूकंपग्रस्त: १) होय २) नाही

क) प्रकल्पग्रस्त १) होय २) नाही

१०) अर्जदार स्वातंत्र्यसैनिकाचा पाल्य आहे का ? १) होय २) नाही

११) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? १) होय २) नाही

१२) परीक्षा शुल्काबाबत तपशील-

डी. डी. क्रमांक------------------------------------ दिनांक / /२०११ रुपये

बँकेचे नांव- स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा --------------------------

१३) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | माध्यम | मंडळ/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष व महिना | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस. एस. सी. | | | | | | |
| २ | एच. एस. सी. | | | | | | |
| ३ | पदवी | | | | | | |
| ४ | पदव्युत्तर | | | | | | |
| ५ | इतर शैक्षणिक अर्हता | | | | | | |

१४) **अर्जासोबत कोणतेही मुळ किंवा प्रमाणित प्रमाणपत्र जोडू नयेत.**

**स्थळः-** **अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी**
**दिनांकः-**

## प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो / करते की, आदिवासी विकास विभागाची जाहीरात मी काळजीपूर्वक वाचली आणि मला समजली. सदर पदासाठी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पूर्तता करतो/करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला निवड प्रक्रियेत दिलेला प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल, परिणामी मिळालेली नोकरी गमविण्यास मी बांधील राहीन व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

दिनांक :
ठिकाण : अर्जदाराची स्वाक्षरी
(दिनांकासह)

---------------------------------------------------------------------------------------------------------------

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये प्रतिज्ञापत्र

मी श्री./श्रीमती ----------------------------------- श्री.--------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ---------- वर्षे, राहणार --------------------------------याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी----------------------------- या प्रकारातील पदासाठी --------------------------आदिवासी विभागाकरीता माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला ------------- (संख्या) इतकी हयात अपत्ये आहेत. यापैकी दि.२८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या ------------ इतकी आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)
३. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

दिनांक :
ठिकाण :

अर्जदाराची स्वाक्षरी